# ग्रामिण तीर्थक्षेत्र श्री. अकलाई देवी देवस्थान,अकलुज,ता.माळशिरस,जि.सोलापूर

प्रा.हमीद उमरअली काझी कला आणि वाणिज्य महाविद्यालयकळंब-वालचंदनगर,ता.इंदापूर,

---

सारांश :-अकलुज हे महाराष्ट्रातील,सोलापूर जिल्हयातील,माळशिरस तालुक्यातील सर्वात मोठे आणि महत्वाचे ठिकाण आहे.येथील ग्रामपंचायत उत्पन्नाच्या दृष्टीने सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणुन ओळखली जाते.गांवात एकुण १९ मंदिरे असुन त्यापैकी एक श्री अकलाई देवीचे मंदिर.या मंदिराला महाराष्ट्र शासनाच्या ग्रामिण तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत 'क'दर्जा मिळाला असुन त्याद्वारे मिळालेल्या निधीतुन अनेक विकासकामे झाली आहेत.आषाढ पौर्णिमेनंतर प्रथम येणाऱ्या मंगळवारी किंवा शुक्रवारी देवीची मोठी यात्रा भरते.त्याला भंडारा म्हणतात.त्यावेळी आणि वर्षभरात भाविक मोठया संख्येने देवस्थान ला भेट देतात.

**प्रास्ताविक** :-१९२२ मध्ये अकलुज ग्रामपंचायतीची स्थापना झाली. १९७७ मध्ये येथे विकास योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. ग्रामिण भागात विकास आराखडा लागु झालेली अकलुज ग्रामपंचायत ही महाराष्ट्रातील पहिली ग्रामपंचायत आहे. (महाराष्ट्र शासनाची अधिसुचना-नगरविकास व सार्वजनिक आरोग्य संचलनालय,मुंबई-३२,क्र.TPS 1776/2269-UD5 दि.२४ डिसेंबर १९७६).अकलुज गावचे एकुण क्षेत्रफळ १३६१ हेक्टर असुन त्यामध्ये बागायती क्षेत्र १०२८ हेक्टर आहे.शेतकरी खातेदारोची संख्या ६१५ असुन ऊस हे मुख्य पिक आहे.गावातील घरांची संख्या १४,४०० असुन खातेदारांची संख्या ७,१२७ आहे. ग्रामपंचायतीचे वार्षिक अंदाजपत्रक १८,११,६७,११४/- रुपयांचे आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची संख्या २०१ आहे यावरुन ग्रामपंचायतीची व्यापकता आपल्या लक्षात येते.[१] अकलुज हे $17^{0}53'36''$ उत्तर अक्षांशावर व $75^{0}1'35''$ पूर्व रेखांशावर आहे.तर अकलाई देवीचे मंदिर $17^{0}53'39''$ उत्तर अक्षांशावर $75^{0}1'21''$ पूर्व रेखांशावर आहे.[२] अकलुज चे किमान तापमान २२ व कमाल तापमान ४१ अंश सेल्सियस आहे येथे वार्षिक सरासरी ४५ सेमी पाऊस पडतो. महाराष्ट्र ही संतांची भूमि आहे. विविध जाती,धर्मातील अनेक महान संत या भूमित होऊन गेले.त्यांच्या उपदेशांमुळे, भक्ती व सुफी चळवळीमुळे जातीय सलोखा व धार्मिक एकोपा निर्माण होण्यास मोलाची मदत झाली. अकलुज च्या आसपास अशी अनेक भक्ती केंदे आहेत.सोलापूर (११० किमी),पंढरपूर (४५ किमी),शिखर शिंगणापूर (५५ किमी),नरसिंगपूर (१८ किमी),वेळापूर (११ किमी),महाळुंग (६ किमी),मोरगांव (९५ किमी),जेजुरी (१३१ किमी),मंगळवेढा (७५ किमी), अरण (५५ किमी)

**ग्रामिण तीर्थक्षेत्र विकास योजना** :- धार्मिक स्थळांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ३० मे १९९६ व २३ ऑगष्ट १९९६ रोजी अ व ब वर्गातील तीर्थक्षेत्रांची वर्गवारी केली.त्याबाबतचे नवे निकष तयार करुन २८ ऑक्टोंबर १९९७ रोजी ग्रामिण भागात क वर्गीय तीर्थक्षेत्र विकास योजना ग्रामविकास खात्याच्या माध्यमातुन राबविण्याचा निर्णय घेतला.राज्याच्या सर्व जिल्हा परीषदेच्या माध्यमातुन ही सोजना राबवली जाते.यातुन जिल्हा नियोजन मंडळाने केलेल्या आर्थिक तरतुदीनुसार सध्या गावोगावच्या धार्मिक स्थळांच्या विकासासाठी निधी मिळत आहे.[३]

**मंदिर : अर्थ,स्वरुप,प्रकार,महत्व.:-**कोणत्याही देवाच्या किंवा देवीच्या मुर्तीभोवती जी वास्तु बांधलेली असते तिला मंदिर असे म्हणतात. मंदिर हा संस्कृत शब्द असुन त्याचा अर्थ घर असा होतो.मानवी जीवनांचे नियंत्रण करणाऱ्या,त्यांच्यावर कमी अधीक प्रमाणात प्रभाव पाडणाऱ्या अती मानवी शक्ती म्हणजे देवदेवता अशा प्रकारची श्रध्दा जगातील अनेक समाजात आढळते.या देवतांचे प्रतिक रुपाने अथवा मुर्तीच्या रुपाने दर्शन घडविणारे स्थळ म्हणजे मंदिर होय. मंदिरात दैवी शक्ती अथवा सामर्थ्य यांचा प्रत्यय येतो अशी सर्वसामान्य श्रध्दा असते. अतीप्राचिन काळापासुन जगात सर्वत्र मंदिरे बांधलेली दिसतात.पण त्यांच्या स्वरुपात मोठे वैविध्य आढळते.मंदिराचे स्वरुप अनेक गोष्टी वरुन ठरत आले आहे.त्यात प्रमुख म्हणजे (१) पूजनिय व उपास्य वस्तुचे स्वरुप (२) पूजेचे व उपासनेचे विधी व उपचार (३) जिथे मंदीर उभारले जाते त्या प्रदेशात असणारी वास्तुशिल्प परंपरा.[४] संपूर्ण मंदीर हे एक दिव्य प्रतिक आहे. गर्भगृह हे मस्तक,मुखमंडप हे नाक,अंतराळ म्हणजे मान,सभामंडप हा देह,प्राकार म्हणजे हात,शिखर वा कळस म्हणजे चौल असे वर्णन भक्तीकोशाच्या पाचव्या खंडात येते. वेदकाळात देवता निसर्गरुप होत्या. पंचमहाभुताची पुजा होई. त्यांना यज्ञाव्दारे आवाहन केले जाई.पुजापध्दतीचा विकास होत गेला.मंदिराला पाठशाळा,गंथालये,धर्मशाळा

जोडल्या गेल्या. जनजागरण,समाजप्रबोधन,शिक्षण,संस्कार यासाठी कीर्तनाचे प्रभावी माध्यम मंदिरामार्फत पुढे आले.वैदिक काळात 'यज्ञ'स्वरुपात उदयाला आलेली मंदीर संस्कृती विविध अंगांनी विकसीत होत आज २१ व्या शतकात मंदिरे ही संकुल किंवा संस्था म्हणुन स्थिरावली आहे.[५] मंदिराचे पाच प्रकार कल्पिले आहेत. अग्नीपुराणात (अध्याय) या पाच प्रकाराचे वर्णन येते. (१) वैराज (२)पुष्कर (३) कैलास (४) माणिक (५) त्रिविष्टप तसेच (१) सिध्दायतन (२) असिध्दायतन (३) आर्ष (४) पौराण (५) मानुष या नावांनीही मंदिरांचे वर्गीकरण आढळते. सिध्दायतन म्हणजे नदीकिनारी किंवा समुद्रावर बांधलेली मंदिरे, असिध्दायतन म्हणजे सत्ताधारी,राजांनी बांधलेली मंदिरे, आर्ष म्हणजे ॠषीमुनींनी,तपस्वी लोकांनी उभारलेली मंदिरे आणि मानुष म्हणजे सर्वसामान्य भक्तांनी,माणसांनी बांधलेली मंदिरे होय.[६] अकलुज चे श्री अकलाई देवीचे मंदीर हे सिध्दायतन व मानुष या प्रकारात मोडते. मंदिरालाच देवालय हा समानार्थी शब्द वापरला जातो.मुर्ती किवा लिंग या प्रतिमेच्या रुपाने असणाऱ्या देवाचे निवासस्थान म्हणजे देवालय.देऊळ हा मराठी शब्द देवालय या शब्दापासुन आला आहे.कुटूंबात जसे देवघर तसे समाजात देवालय कारण बहुसंख्य देंवालये सार्वजनीक स्वरुपाचीच असतात.[७] गांवातील निवडक स्थाने किंवा गांवाबाहेरील जलाशय,पर्वत,गुहा,वृक्ष,कुंज,शिळा इ. स्थाने पवित्र मानुन तेथे देवालये बांधली जातात.क्वचित एखादया व्यक्तीला विशिष्ठ ठिकाणी देवालय बांधण्याचा दृष्टांत झाला असे मानतात.मंत्रपुर्वक स्थलशुध्दी केल्यावर मंदिर वास्तुकलेच्या नियमांना अनुसरुन त्या स्थानावर वास्तु बांधतात.तेथील गाभाऱ्यातील पिठीकेवर मुर्तीची स्थापना केली जाते.ती मुर्तीकलेच्या नियमांना अनुसरुन माती,लाकुड,पाषाण आणि धातु यापैकी एका माध्यमात केली जाते.मुर्तीची विधीपुर्वक प्राणप्रतिष्ठा करणे हे अत्यंत महत्वाचे वैशिष्ठ्य होय.देवदेवीचे प्रतिक स्वयंभु असेल तर ते चेतनच असल्याने तिची पुन्हा प्राणप्रतिष्ठा नसते. प्राणप्रतिष्ठेनंतर मुर्ती चेतन देवता बनते. व मग 'जे मानवी देहाला ते देवाला' या न्यायाने तिचे सर्व उपचार केले जातात.ठराविक वेळी नित्यनेमांनी शुचिर्भूत होऊन त्याची पूजा केली जाते.षोडशोपचाराने केली जाणारी पूजा ही महापूजा असते.परंतु ती शक्य नसल्यास केवळ पंचोपचारांनीही पूजा केली जाते.सर्व देवतांच्या पुजेंचे उपचार बऱ्याच प्रमाणात समान असले तरी पुजासाहित्य,मंत्र इ. बाबतीत फरक असतो.[८] पूजाअर्चा,कथाकीर्तन,भजनप्रवचन,धार्मिक ग्रंथांचे पारायण,चर्चासत्रे,धर्मसभा,पाठशाळा,उत्सव,जत्रा,कौल लावणे,दिव्य करणे, न्यायनिवाडा करणे इ. मुळे देवालयांना सं्स्कार केंद्राचे व ज्ञानपिठाचे स्वरुप प्राप्त झालेले होते.पूर्वी क्रांतीकारक,महापुरुष महत्कार्यायाठी मंदिरातुन शपथा घेत.अनेक संतांची चरित्रे मंदिर परिसरात घडली आहेत.अनेक धर्मग्रंथ तेथे लिहले गेले आहेत. नृत्य,वादन,गायन,शिल्प धातुकाम,विणकाम, वास्तुकला,चित्रकला, मुर्तीकला इ. कलांना मंदिरामुळे उत्तेजन मिळाले.म्हणुनच प्राचिन संस्कृती व इतिहास यांचे ज्ञान होण्यास मंदिरांची मोठी मदत होते.पुर्वी सांस्कृतिक आणि धार्मिक दृष्टीने गावावर मंदिरांचेच प्रभुत्व असे.[९]

<u>मुर्तीपूजा :</u> विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या एखाद्या अलौकीक,अमोघ परंतु अदृष्य शक्तीबध्दल मानवाला सुरुवातीपासुनच आकर्षण आहे.कुतुहुल आहे.टोळयांच्या स्वरुपात तो जीवन कंठीत असताना अशा शक्तीबध्दल त्याला अज्ञानापायी भय वाटत असे.ते दूर करण्यासाठी त्याने या शक्तींची पूजा करण्यास सुरुवात केली.या काळात त्या शक्तीदेवताच होत्या.संघर्षाच्या काळात जेत्या टोळयांचे मुख्य दैवत व जित टोळयांचे उपदैवत अशी विभागणी झाली.मात्र त्यांना सगुण साकार रुप दिले गेलेले नव्हते.वृक्ष,डोंगर,पशु-पक्षी,अग्नी,नदी अशा सजीव निर्जीव दोन्ही ठिकाणी ही दैवी शक्ती निवास करते अशा दृढ श्रध्देपायी ते त्यांचीच पूजा करीत.पुढे दैवी शक्तीला मुर्त स्वरुप देण्याची देण्याची कल्पना मानवाला सुचत गेली.प्राचिन संस्कृतीत या मुर्ती कल्पनेचे मुळ शोधता येते.द्रविड हे पुजक होते तर आर्य यजन-याजन करणारे होते.पुजा हा शब्द मुळ द्रविडी भाषेत आढळतो.आर्य -द्रविड यांचा जेव्हा समन्वय झाला.तेव्हा आर्यांनी द्रविडांचा पुजाप्रकार उचलला असावा असा काही विद्वानांचा कयास आहे.यज्ञयागात क्लिष्टता होती.सर्व वर्णियांना व स्त्रियांना त्याचा अधिकार नव्हता.द्रविडांनी देवपुजेत हा अधिकार सर्वांना दिला. त्यामुळे या काळापासुन देवपुजा,मुर्तीपुजा दृढ झाली असे म्हणावयास हरकत नाही.वेदकाळात स्मृती, वेदोत्तर काळात पुराणे,ब्राह्मणे,सुत्रे या काळात मुर्तीपुजा रुढ झाली होती.[१०] मुर्तीपुजा लोकप्रिय झाली.याचे कारण मुर्तीच्या ठिकाणी पार्थिव असे परमेश्वराचे रुप साकार झाले असे मानले जाऊ लागले.निर्गुण व निराकार उपासना ही सर्वसामान्य माणसाला कष्टसाध्य असल्याने व मुर्तीपुजेमुळे परमेश्वराचे रुप आकारबध्द असल्याने एकाग्रचित्ते उपासना करता येते अशी सर्वसामान्य लोकांची

श्रध्दा बनली.अशा सगुण साकार देवतेला पूजाविधी करुन,प्रार्थना करुन संतुष्ट करण्याचा आणि कृपाप्रसाद मिळविण्याचा विचार बळावत गेला.मनन-चिंतन याद्वारा मनःशांती आणि स्वतःच्या उद्दिष्ठांच्या पुर्तीसाठी परमेश्वराचे सहाय्य अशा भावनेतुन मुर्तीपुजा अधिक लोकप्रिय होत गेली.[११]

श्री अकलाई देवी मंदिर :-अकलुज गावातील नीरा नदीच्या काठावर श्री अकलाई देवीचे मंदिर आहे.सुरवातीला गावकऱ्यांनी नीरा नदीच्या कडेला देवीची प्रतिष्ठापना केली.सहकार महर्षी कै.शंकरराव मोहिते पाटील,कै.बाबासाहेब माने पाटील, कै.सदाशिवराव माने पाटील या तीन बंधुसह गावातील काही प्रतिष्ठीत नागरिकांनी देवीचे लहानसे मंदिर बांधले.गाभारा आणि बाहेर खुला पत्र्याचे शेड असलेला आयताकृती सभापंडम असे त्याचे स्वरुप होते की जे परंपरागत होते.प्राचिन काळी अशाच प्रकारची मंदिरे बांधली जात. आज उपलब्ध असणारे सर्वात प्राचिन मंदिर गुप्तकाळातील (इ.स.४ थे शतक) आहे.चौरस गाभारा व समोर आयताकृती प्रवेशमंडप एवढेच त्याचे भाग आहेत.[१२] श्री अकलाई देवी अकलुज चे ग्रामदैवत आहे.

ग्रामदैवत :ग्रामसंस्थेला भारतात विशेष महत्व असुन गावाची जी संरक्षक दैवते असतात त्यांना ग्रामदैवते म्हणतात. ग्रामसंस्थेत या ग्रामदैवतांना प्राचिन काळापासुन खुप महत्व असल्याचे दिसते.बहुतांश ग्रामदैवते स्त्रीरुपे आहेत. मोहेंजोदडो व इतर अनेक ठिकाणी झालेल्या उत्खणणात मातृदेवतेच्या मुर्ती वैपुल्याने आढळल्या आहेत. मातृदेवतांची कृपा असेल तर रोगराई,दुष्काळ,नैसर्गीक आपत्ती येत नाहीत,तसेच धनधान्याची विपुलता होऊन सर्वांचे कल्याण होते अशी भाबडी पण ठाम समजुत ग्रामिण जनतेत आहे.[१३]

श्री अकलाई देवी मंदिराचा जिर्णोध्दार :- १२ मार्च १९८१ रोजी नामदार श्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'श्री अकलाई देवी देवस्थान, अकलुज'या नांवाने सार्वजनीक न्यासाची स्थापना झाली.दि. १४ एप्रील १९८३ रोजी ह.भ.प.विठोबा महादू आसबे यांच्या हस्ते देवीची मुर्ती आहे त्याच ठिकाणी ठेऊन मंदिराच्या जिर्णोध्दार कामास सुरुवात करण्यात आली.मंदिर दगडी कलाकुसरीचे असावे असे ठरविण्यात आले. अभियंता श्री.एच.आर.दोभाडा यांच्याकडुन प्रारंभीक स्वरुपाचा आराखडा तयार करुन घेण्यात आला.दगडी बांधकाम घडईचे काम कै. रामचंद्र रंगनाथ धोत्रे ऊर्फ चंदर मिस्त्री आणि कै. लक्ष्मण दूर्गा विटकर या स्थानिक व्यक्तींनी केले. श्री.नामदेव जाधव (मुकादम) यांनी परिसरातुन तसेच पुणे जिल्हयातुन उत्कृष्ठ पाषाण शोधुन मंदिराच्या ठिकाणी आणुन देण्याची जबाबदारी पार पाडली. १९९१ मध्ये महाराष्ट्र शासनाने एका स्वतंत्र अध्यादेशाने 'श्री अकलाई देवी देवस्थान' नांवाने जमीन मंजुर केली.मंदिरालगत असणारी आठ आर एवढी जमीन श्री.किसनराव होनमाने यांनी दानपत्र करुन दिली.मंदिराच्या आजच्या जडणघडणीत अनेकांनी महत्वपुर्ण योगदान दिले. राजमाता, अक्कासाहेब कै. रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांचा त्यात सिंहाचा वाटा आहे.तसेच सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर, (अकलुज) सुमित्रा पतसंस्था यांचे भरीव योगदान आहे. मंदिरामध्ये गाभाऱ्यातील मुर्ती सिंहासनारुढ आहे. कर्नाटकातील कुमठा येथील हस्तकलेतील राष्ट्रपती पारितोषीक विजेते श्री.वासु संभा शेठ यांनी तयार केलेला नमुना पसंत करुन त्याप्रमाणे दारावरील लाकडी कोरीव काम,मेघडंबरी प्रभावळ साकार झाली.मंदिराचे वैभव कळसाने झळकते.त्याशिवाय मंदिराला पुर्णत्व येत नाही.श्री.सदाशिव पाटील,नांदेड या शिखर बांधकामात हातखंडा असलेल्या कलाकाराकडुन अध्यात्म व वास्तुशास्त्र गृहीत धरुन २७ नक्षत्र योग आकाराचे ५१ फुट उंचीचे वास्तुवैभव योगाकार मंडित शिखर बांधकामाचे नियोजन करुन – गर्भमंदिर (नवग्रहदेवता) ९ कळस,दर्शन मंडप (नवदेवता) ९ कळस व मुखमंडप (शिवपंचम) ९ कळस याप्रमाणे तिन्ही शिखरावर एकसुत्री कळस स्थापित केले आहेत. मंदिरात प्रवेश करताना सात पायऱ्या चढुन जावे लागते.षढरिपूच्या सहा पायऱ्या ओलांडून स्वच्छ व निर्मळ मनाच्या सातव्या पायरीला स्पर्श करुन दर्शन मंडपात प्रवेश व्हावा ही त्यामागची संकल्पना आहे दर्शन मंडपात उत्तरेस चार,दक्षिणेत चार अशा आठ कमानी व मुख्य गाभारा असा नवविधा भक्तीचा संगम साधला आहे.अष्टांग भावाने भाविकाने 'श्री'च्या ज्वाज्वल्यरुपाचे दर्शन घेऊन कृतार्थ व्हावे यासाठी देवीचा अष्टांग गाभारा आकारास आला. श्री अकलाई देवी मंदिरास तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यानंतर १४ ऑगष्ट २००४ रोजी मंदिर सुशोभीकरणास प्रारंभ झाला. आज हे मंदिर एका नव्या रुपात उभे आहे.वीज,पाणी,स्वच्छता,बागबगीचा अशा सोयींनी युक्त आहे.मंदिराच्या पूर्वेस भव्य प्रवेशद्वार,त्याच्या लगत

देवस्थानचे मुख्य कार्यालय,सवाष्णीच्या कार्यक्रमासाठी भव्य वास्तु,उत्तरेस व दक्षिणेस लोखंडी ग्रील लावलेल्या भक्कम सरंक्षक भिंती,नदीवर जाण्यासाठी सुंदरसा घाट,पूर्वेस दोन व पश्चिमेस दोन अशी विश्रांतीगृहे (डोम),डेरेदार सावलीची झाडे,झाडांना ओटे,संपूर्ण आवाराचे क्रॉक्रीटीकरण,मंदिराच्या भोवतीच्या रस्त्याचे रुंदीकरण,संपूर्ण आवारात लाईट व आधुनिक ध्वनी व्यवस्था करण्यात आली. मा.ना. श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसर सुशोभित करण्याचे काम पर्ण करण्यैंत आले.[१४]

<u>मंदिर आणि परिसर :-</u> श्री अकलाई देवीचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. अकलुज-टेंभुर्णी रस्त्यावर मंदिराकडे येणाऱ्या मार्गावर नगारखान्याची इमारत आहे.तेथुन आत आले की समोर मंदिराची,मनाला शांतता देणारी,देहभान हरपुन टाकणारी व डोळयात साठवुन ठेवावी अशी आकर्षक वास्तु दिसते. समोर त्याला साजेसे असे भव्य प्रवेशद्वार आहे.मंदिराच्या उत्तरेला नीरा नदी तर पश्चिमेला ओढा आहे.दक्षिणेला तीस फुटी रस्ता असुन तो मंदिरासमोर विभागतो.त्यापैकी एक लुमेवाडी,ता.इंदापूर,जि.पुणे या गांवाकडे तर दूसरा माळीनगर,टेंभूर्णी व अकलुज कडे गांवात जातो. मंदिराच्या प्रवेशद्वारातुन आत गेल्यावर डाव्या बाजुस मोफत चप्पल स्टॅंड आहे.त्यामध्ये चप्पल ठेऊन भक्त निर्धास्तपणे आत जातात. तेथुन मंदिराच्या मार्गावर सुरुवातीलाच एक स्टेप खाली सखल भागात उतरावे लागते.बाजुला असलेल्या पाईपमधुन पाणी त्या सखल भागात सोडले जाते.भाविकांना तेथुनच जावे लागत असल्याने त्यांचे पाय आपोआपच त्या पाण्यात धुतले जातात. पाण्यात धुतलेल्या स्वच्छ पायांनी. भाविकांनी मंदिरात यावे अशी ही योजना आहे.फरशीवरुन चालताना भाविकांचे पाय पोळू नयेत तसेच त्योना ऊन लागु नये म्हणुन मंदिराच्या पायरीपर्यंत हिरव्या कापडाचे आच्छादन करण्यात आले आहे. मंदिरासमोर खाली चबुतऱ्यावर गाभाऱ्याकडे तोंड करुन बसलेल्या नंदीचे शिल्प आहे.मंदिराच्या सभापंडपाचे बांधकाम जाळीदार आहे.घडीव व ताशीव दगड एक आड एक ,एकावर एक ठेऊन बांधकाम केल्याने ते जाळीदार बनले आहे.त्याच्या आपोआपच खिडक्या तयार झाल्या आहेत.त्यामुळे दर्शन मंडपात व गाभाऱ्यात खेळती हवा राहते. गाभाऱ्याची इमारत अष्टकोनी असुन छत तसाच बाहेर काढुन त्याचा सज्जा बनविला आहे.त्यावर उत्तर व दक्षिणेला गोमुखाचे शिल्प आहे.प्रकाश व हवा खेळती रहाण्यासाठी प्रत्येक बाजुच्या भिंतीवर सज्जाच्या खाली व वर आयताकृती लहान लहान खिडक्या आहेत. गाभाऱ्यावर एक,पुढे दर्शनमंडपावर एक आणि त्यापुढे सभामंडपावर एक असे उतरत्या उंचीच्या क्रमाने तीन शिखरे आहेत. प्रत्येक शिखरावर नऊ असे तीन शिखरावर मिळुन सत्तावीस कळस आहेत. कोणत्याही दिशेने मंदिराच्या शिखराकडे पाहिल्यास एकापुढे एक चढत्या क्रमाने असलेल्या तीन शिखरावरील तीन कळस व डाव्या बाजुचे एक व उजव्या बाजुचे एक असे पाच कळस दिसतात. त्यापैकी मधले उंच कळस सामाईक असुन ते कोणत्याही दिशेने दिसते.प्रत्येक शिखराचे मिळुन नऊ कळस असे तीन शिखरावरील मिळुन सत्तावीस कळस आहेत. सत्तावीस नक्षत्रांचे ते प्रतिक आहे. मंदिरासमोर पुढे उंच लोखंडी शिडीच्या आकाराच्या लोंखडी खांबावर भगवा-लाल रंगाचा ध्वज फडकत राहतो. श्री अकलाई देवी मंदिराचा परिसर अतिशय सुंदर आहे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची व्यवस्था तेथे करण्यात आली आहे. मंदिराबाहेर फुल,नारळ विक्रेत्यासांठी १२ गाळयांचे बांधकाम करण्यात आले आहे.तसेच मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या आत डाव्या बाजुला भव्य दीपमाळेचे बांधकाम सुरु असल्याचे दिसते.

<u>दीपमाळ :-</u> दीपमाळ हा महाराष्ट्राचा एक शिल्पप्रकार आहे.देवाच्या मुर्तीसमोर दिवा तेवत ठेवण्याची प्रथा अत्यंत प्राचिन आहे.त्यासाठी मंदिराला दिलेल्या दानांची नोंद शिलालेखात व ताम्रपटात पहावयास मिळते.उत्सवप्रसंगी शहरात दिपवृक्ष पाजळत असल्याचे उल्लेख रामायणासारख्या ग्रंथात आले आहेत.दक्षिण भारतातील मंदिरात दगडाच्या व पंचधातुंच्या दीपलक्ष्मी व दिव्याची झाडे दिसतात.तसेच देवालयासमोर दीपस्थंभेही असतात.पण दिपमाळ हे महाराष्ट्रीयन शिल्पकलेचे खास वैशिष्ठ्य मानता येईल.विटांच्या किंवा दगडांच्या वर निमुळता होत जाणरा स्थंभ उभारुन त्यांच्यात ओळीने हात बसविलेले असतात.त्या हातावर व स्थंभाच्या माथ्यावर पणत्या ठेवल्या जातात.उत्सव प्रसंगी, दिवाळीच्या वेळी,त्रिपूरी पौर्णिमेला या माळा उजळण्यात येतात.नवस फेडण्यासाठी देवळासमोर दिपमाळ उभारण्याची प्रथा मराठेशाहीत रुढ होती.[१५] श्री अकलाई देवीच्या मंदिरात उभारला जाणरा दिपस्थंभ हा भव्य आहे.त्यासाठी घडीव दगडांचा वापर केला जात आहे.

<u>श्री अकलाई देवी मंदिरात वर्षभरात होणारे उत्सव :-</u>[१६](१) ाानेवारी (पौष):- मकर सक्रांत, शाकंबरी नवरात्र, देवी महात्म्य

पारायण सोहळा (पौष शुध्द षष्टी, सप्तमी, अष्टमी).(२)फेब्रुवारी(माघ):-देवी महात्म्य पारायण सोहळा (माघ शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी).(३) मार्च (फाल्गुन ) :- देवी महात्म्य पारायण सोहळा (फाल्गुन शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी).(४) एप्रील (चैत्र ) :- वासंतीक नवरात्र महोत्सव. (५) मे (वैशाख ) :- देवी महात्म्य पारायण सोहळा (वैशाख शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी). नवचंडी याग,विष्णु याग, कुंकुम अर्चन.(६) जुन (ज्येष्ठ ) :- देवी महात्म्य पारायण सोहळा (ज्येष्ठ शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी). (७) जुलै (आषाढ) :- गुरु पौर्णिमा, यात्रा (भंडारा- पौर्णिमेनंतर प्रथम येणाऱ्या मंगळवारी किंवा शुक्रवारी ) (८) ऑगष्ट (श्रावण ):- देवी महात्म्य पारायण सोहळा (श्रावण शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी).(९) सप्टेंबर (भाद्रपद) :-देवी महात्म्य पारायण सोहळा (भाद्रपद शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी).(१०) ऑक्टोबर (आश्विन) :- शारदीय नवरात्र महोत्सव (आश्विन शुध्द प्रतिपदा ते आश्विन शुध्द दशमी ), कोजागिरी पौर्णिम (११) नोव्हेंबर (कार्तिक ) :- देवी महात्म्य पारायण सोहळा (कार्तिक शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी). त्रिपुरारी पौर्णिमा व दिपोत्सव. (१२) डिसेंबर (मार्गशिर्ष ) :- देवी महात्म्य पारायण सोहळा (मार्गशिर्ष शुध्द षष्टी,सप्तमी,अष्टमी). शतचंडी याग अशा प्रकारे देवस्थानच्या वतीने वर्षभरात विविध कार्यक्रम,उत्सव साजरे केले जातात. सर्वच उत्सवांना मोठया संख्येने भाविक श्री अकलाई मातेसमोर आपली हजेरी लावतात.देवीचा भंडारा, नवरात्र आणि त्रिपुरारी पौर्णिमेला भाविकांचा महापूर लोटलेला दिसतो.

<u>देवीचा भंडारा :-</u> आषाढी पोर्णिमेनंतर प्रथम येणाऱ्या मंगळवारी किंवा शुक्रवारी देवीची यात्रा भरते. यालाच देवीचा भंडारा असेही म्हणतात.या दिवशी पहाटे मंगलमय वातावरणात श्री अकलाई मातेस मंगल स्नान,पंचामृत महाभिषेक झाल्यावर,महावस्त्र परिधान केल्यानंतर,देवीस पूर्ण शृंगार करुन महालंकार,महापुजा,महाआरती झाल्यानंतर तोंफांची आतिषबाजी होते व त्यानंतर शिऱ्याचा प्रसाद वाटप पहाटे पाच ते रात्री अकरा वाजेपर्यंत चालु असतो. दुपारी महापूजा होते.या महापूजेसाठी ग्रामस्थ शिजवलेला भात घेऊन येतात. तो एकत्रित करुन दहीभाताची महापूजा देवस्थानचे कार्यकारी विश्वस्त मा.श्री जयसिंह शंकरराव मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी मा.सौ.सुलक्षणादेवी या उभयतांच्या हस्ते संपन्न होते.दूसऱ्या दिवशी छबीना निघतो. खास महिलांसाठी सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत दर्शन रांग राखीव असते यावरुन आपणास भविकांच्या संख्येचा अंदाज येऊ शकेल.

<u>नवरात्र महोत्सव :-</u> आश्विन शुध्द प्रतिपदा ते आश्विन शुध्द दशमी आणि त्यानंतर कोजागिरी पौर्णिमा या काळात देवीमातेची दुग्ध स्नान,सुगंधी द्रव्य स्नान,हळदी-कुंकु स्नान,मंगल स्नान,पंचामृत स्नान,केशर स्नान,गंगा स्नान इ.विविध उपचारांनी,षोडोपचार पध्दतीने देवीस महामस्तकाभिषेक,महापुजा व अलंकार पुजा केली जाते. नवरात्र काळात श्री अकलाई मातेची विविध रुपे पहावयास मिळतात.दशमीला सायंकाळी सिमोल्लंघनाचा कार्यक्रम होतो. छबीना संपल्यानंतर सार्वजनीक सिमोल्लंघनास सुरुवात होते. नवरात्र काळात रात्रीचा थोडासा कालावधी सोडला तर मंदिर परिसरात अहोरात्र वर्दळ असते.

<u>त्रिपुरारी पोर्णिमा :-</u> कार्तिक पोर्णिमेला देवीची महापुजा व अलंकार पुजा केली जाते.सायंकाळी त्रिपुरवाती, ७५० वाती एकत्र करुन त्या द्रोणामध्ये घेऊन नीरा नदीच्या पात्रात सोडल्या जातात.सायंकाळी मंदिर परिसरात हजारोंच्या संख्येत दिवे लावले जातात आणि दिपोत्सव साजरा केला जातो.

<u>शेणोलीचे श्री अकलाई देवी मंदिर</u> :-श्री अकलाई देवी अकलुजची ग्रामदेवता आहे. ग्रामदेवता या गावनिहाय वेगवेगळया असतात.ठराविक देवता सोडल्यास इतर देवतांची नांवे वेगवेगळी आढळतात.कराडपासुन १५ किमी अंतरावर असणाऱ्या शेणोली या गांवी श्री अकलाई देवीचे मंदिर आहे.विशेष म्हणजे या देवीची दोन मंदिरे असुन एक गांवात कराड-सांगली रस्त्यालगतसपाटजागेवर व दूसरे तेथुन ५ किमी अंतरावर डोंगरावर आहे.गांवातील मंदिर उत्तराभिमुख असुन डोंगरावरील मंदिर पश्चिमेभिमुख आहे.देवीची यात्रा होळीच्या दुसऱ्या दिवशी भरते. यावेळी गांवातील मारुतीच्या मंदिरातुन पालखी डोंगरावरील देवीच्या मंदिरात जाते.

<u>समारोप :-</u> मनःशांती देणारे,सर्व दुःख विसरण्यास लावणारे एक पवित्र स्थान म्हणुन भाविकांच्या मनात मंदिराचे स्थान महत्वाचे असते. अकलुजचे श्री अकलाई देवीचे मंदिरही असेच आहे.या मंदिर परिसरात अनेक मराठी चित्रपटांचे शुटिंगझाले आहे.श्री अकलाई मातेच्या गीतांची 'अकलाई माझी सत्वाची' ही व्ही.डी.ओ.निघाली आहे. अकलुजग्रामपंचायतीचा व देवस्थानचा श्री.अकलाई देवी मंदिरास 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न चालु आहे.

**<u>निष्कर्ष</u>**:-

१)श्री अकलाई मंदिर व परिसर अतिशय आकर्षक व सुंदर आहे.

२) मंदिर परिसरात वेगवेगळया प्रकारची झाडे लावलेली आहेत.पक्षी व लोकांसाठी ती विश्रांती स्थाने बनली आहेत.
३) मंदिर परिसरात क्षणभर विश्रांती घेण्यासाठी,दोन विश्रांतीस्थाने (डोम),असंख्य झाडे व त्याभोवती पार आहेत.

४) मंदिर परिसरातील झाडाभोवती बांधलेले पार एकाच आकाराचे नसुन वेगवेगळया आकाराचे आहेत.

५) मंदिर परिसरात पोपटांचा वावर आहे.अशा वास्तुमध्ये सहसा कबुतरांचा किंवा पारव्यांचा वावर असतो.
६) अकलुजमध्ये आलेल्या व कोणत्याही ठिकाणी असणाऱ्या व्यक्तीला मंदिराकडे येण्यासाठी पक्क्या रस्त्यांची व वाहतुकीच्या साधनांची सोय आहे.
७) काही वर्षापुर्वी अंधारात असलेला व निर्मनुष्य असलेला हा परिसर आता नेहमी गजबजलेला असतो.

८) पुर्वी मंदिरात फक्त मंगळवार,शुक्रवारी येणारे भाविक आता नेहमी येतात. दररोज नित्यनेमांनी येणाऱ्या भाविकांची संख्या ही मोठी आहे.

९) फोटोग्राफीच्या व्यवसायाला येथे संधी आहे.इन्स्टंट फोटो ची सोय झाल्यास पर्यटकांना, भाविकांना त्याचा फायदा होईल.

१०) यात्राकाळात (भंडारा) दर्शनासाठी, महिलासांठी वेगळी वेळ राखुन ठेवावी लागते यावरुन आपणास भाविकांच्या संख्येची कल्पना येते.

११) मंदिरात किंवा मंदिर परिसरात देणगीदारांच्या नांवाचे फलक कोठे ही दिसत नाहीत त्यामुळे मंदिर सुशोभिकरणाला कोठे ही अडथळा आलेला नाही.
१२) मंदिराजवळच भक्तनिवास असल्याने दुरहुन येणाऱ्या भाविकांची सोय झाली आहे.
१३) श्री अकलाई मंदिर व मंदिर परिसर आकर्षक,सुंदर होण्यासाठी देवस्थानच्या विश्वस्तांनी खुप परिश्रम घेतले आहेत. पण विश्वस्तांच्या नांवांचा फलक मंदिर परिसरात कोठेही नाही.तो त्यांचा मोठेपणा आहे.पण असा फलक असावा.त्यामंळे लोकांना विश्वस्तांची माहिती होईल.
१४) देवस्थानच्या विश्वस्तांच्या नावाबरोबर जिर्णोध्दार,कलशारोहण समारंभ,देवीचा भंडारा तसेच मंदिरात वर्षभरात होणाऱ्या विविध उत्सवांच्या माहितीचा फलक लावल्यास परगांवच्या भाविकांना त्यांची माहिती होईल व त्यांना त्यादृष्टीने नियोजन करता येईल.
१५) मंदिराचे पुजारी श्री.नंदकुमार,श्री.मोहन व श्री. मदन गुरव हे देवी मातेची व येणाऱ्या भक्तांची प्रामाणिकपणे सेवा करीत आहेत.

संदर्भ :-

(१)अकलुज ग्रामपंचायतीने प्रसिध्द केलेली माहिती पुस्तिका (२) www.wikimapia.com
(३) सकाळ,पुणे,रविवार,१ जुलै २०१२. (४) माटे,म.श्री.(१९८५),मंदिर- वास्तुकला,मराठी विश्वकोश,खंड १२,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई,पान ८७६. (५) खरे,प्रा.मधुकर पांडुरंग (२०११), कोकणातील मंदिरे,कोकण : विविध दिशा आणि दर्शन,संपादक - दीक्षित, डॉ.लीला, प्रतिमा प्रकाशन,पुणे.पान १६९. (६) ड्डित्ता (७) साळुंखे,आ.ह.(१९७७),देवालय-मराठी विश्वकोश,खंड ७,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई, पान ९२०. (८) कित्ता,पान ९२१ (९) कित्ता (१०) गुंडी,सौ.प्रतिभा (१९८९), भारतीय समाज विज्ञान कोश,खंड३, संपादक-स.मा.गर्गे, समाज विज्ञान मंडळ,पुणे. पान ५१२. (११) कित्ता. (१२) माटे,म.श्री.(१९८५),उपरोक्त, पान ८७९. (१३) सुर्वे,भा.ग.(१९७७),ग्रामदैवते, मराठी विश्वकोश,खंड ५,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, पान ३४७. (१४) मा.जयसिंह मोहिते पाटील,कार्यकारी विश्वस्त, श्री अकलाई देवी देवस्थान,अकलुज यांनी दि.७ डिसेंबर २००५ रोजी प्रसिध्द केलेली पुस्तिका (१५) माटे,म.श्री.(१९७७),दिपमाळ,मराठी विश्वकोश,खंड ७,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई, पान ७९८. (१६) अकलुज ग्रामपंचायतीचा,श्री.अकलाई देवी मंदिरास 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी तयार केलेला प्रस्ताव.